# परिक्रमा

## कुरोसावाला मरणोत्तर हॉलीवूडचा लेखक सन्मान

लॉस एंजलीसच्या 'रायटर्स गिल्ड ऑफ अमेरिका'या चित्रपट लेखकाच्या संस्थेतर्फे यावर्षीचा ज्यॉ रेनॉर पुरस्कार अकीरा कुरोसावा आणि त्याचे तीन पटकथा लेखक यांना देण्यात येणार आहे. किकोशुमो, हदयो ओगुनी, व शिनाबु हाशीमोटो या तीन लेखकांनी कुरोसावा सोबत त्याचे चित्रपट लिहले. या चौघांपैकी फक्त हाशीयोरो जिवंत असून तो ९४ वर्षांचा आहे. तो पारितोषिक घ्यायला येऊ शकणार नाही. नॉन हॉलीवूड चित्रपट लेखकांसाठी हा पुरस्कार फ्रेंच दिग्दर्शक रेनॉरच्या नावे दिला जातो. कुरोसावाला १९९०मधे विशेष ऑस्कर देण्यात आले. १९९८ला त्याचे निधन झाले.

कुरोसावाने दिलेल्या अभिजात चित्रपटांपैकी किकुशीमोने स्ट्रे डॉग (१९४९) आणि योजिम्बो (१९६१) हे दोन चित्रपट लिहले. राशोमन (१९५०) हा हाशामोटोने लिहला होता तर ओगुनी व हाशीमोटो यांनी मिळून इकीरु (१९५२) आणि सेव्हन समुराय (१९५४) लिहले तर तिन्ही लेखकांनी एकत्र येऊन कुरोसावा बरोबर थ्रोन ऑफ ब्लड (१९५७) व हिडन फोट्रेस (१९५८) हे दोन चित्रपट लिहले. किकोशुमो १९८९ मधे आणि आगुनी (१९९६) मध्ये निधन पावले.

## केरळातले कालचे थिएटर आजचे हॉटेल

केरळ मधल्या इडविसी जिल्ह्यात मुन्नर हे छोटेसे हिल स्टेशन आहे. १९२० साली ओएस चेट्टीयार यांनी तेथे पंकजम हे थिएटर बांधले. १९२९/३० पर्यंत प्रेक्षकांनी एक आणा तिकीटांत बाकड्यावर बसून मूकपटांचा आस्वाद घेतला. नंतर बोलपटांचा जमाना सुरू झाला. १९६० मधे मूळ थिएटरचे रिनोव्हेशन करून नवीन प्रोजेक्टर आणण्यात आले व 'न्यू पंकजम' सुरू झाले.



चेट्टायारनी चित्रपटगृह मथाई यांना विकले. टेलीव्हिजन आल्यानंतर चित्रपटगृहातला प्रेक्षक घटला. तेव्हा मथाईंनी त्याच वास्तूचे आधुनिकीकरण करून 'सिल्व्हर स्ट्रीप' हे आलीशान हॉटेल बनविलं. पण सिनेमाचा वारसा कायम रहावा यासाठी ८०० पोट्रेटस, शुटींग क्रेन, क्लॅप बोर्ड यांनी हे हॉटेल सजलेले आहे.

## स्क्रीन पारितोषिके मंगेश देसाई व प्रिया बापट यांना

या वर्षीच्या 'स्क्रीन' साप्ताहिकाच्या पारितोषिकांत 'खेळ मांडला' मधील भूमिकेसाठी मंगेश देसाई आणि 'काकस्पर्श' मधील भूमिकेसाठी प्रिया बापट यांचा अभिनयाची पारितोषिके मिळाली.

## ऋत्विक घटकचा 'मेघे ढाके तारा' हाँगकाँग महोत्सवांत

मेघे ढाके तारा हा ऋत्विक घटकचा ६०च्या दशकातला अभिजात चित्रपट डिजिटली करण्यात आला असून एप्रील मधे हाँगकाँग महोत्सवात तो दाखविण्यात येणार आहे.

(पान २४ वर)

# महाराष्ट्र शासनातर्फे सिनेमा शताब्दी साजरी करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन

### सांस्कृतिक मंत्री संजय देवताळे यांची घोषणा

**भारतीय** चित्रपटसृष्टीला ३ मे, २०१३ रोजी १०० वर्षे पूर्ण होत असून २०१२-१३ हे वर्ष भारतीय चित्रपट सृष्टीचे शतक महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करण्याचा महाराष्ट्र शासनाने निर्णय घेतला असून त्यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे व चित्रपटसृष्टीच्या सर्वांगिण विकासासाठी व भविष्यात चांगला परिणाम साधण्यासाठी विविध योजना सुरु करण्याचा राज्य शासनाचा विचार होता. त्या दृष्टीने मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांच्या अध्यक्षतेखाली एक महोत्सव समिती गठीत करण्यात आली होती. समितीच्या शिफारशीप्रमाणे शताब्दी सोहळा साजरा करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. याची माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री संजीव देवताळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.




चित्रपट शताब्दीचा महाराष्ट्र शासनाचा लोगो

**१. आठ शहरांत चित्रपट महोत्सव**

राज्यातील ६ महसुली विभागामध्ये म्हणजे औरंगाबाद, अमरावती, नागपूर, पुणे, नाशिक आणि रत्नागिरी (कोकण विभाग) येथे व राज्याची राजधानी मुंबई येथे आणि मराठी चित्रपटाची पंढरी म्हणून ओळखले जाणारे कोल्हापूर अशा ८ शहरांमध्ये मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीची वाटचाल दर्शविणारे उत्कृष्ट २१ मराठी व ७ हिंदी चित्रपट दाखवले जाणार आहेत. त्या निमित्ताने मराठी रसिकांना १०० वर्षातील चित्रपट वाटचालीची व निर्माण झालेल्या महत्त्वाच्या चित्रपटांची नव्याने ओळख होऊ शकेल. मुंबई येथे २ मे, २०१३ रोजी महोत्सवाचा सांगता समारंभ होणार आहे. महोत्सवाची सुरुवात दादासाहेब फाळकेंच्या **''राजा हरिश्चंद्र''** व **''कालीया मर्दन''** या चित्रपटातील काही निवडक भाग जो राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय यांनी जतन केला आहे ते दाखवून केली जाणार आहे. महोत्सवांचा प्रारंभ १५ फेब्रुवारी पासून नाशिक येथे होत आहे.

**२) लघुपट व माहितीपट स्पर्धा**

आगामी काळात नवोदित दिग्दर्शकांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने लघुपट व माहितीपटाची एक स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. त्यासाठी २५ फेब्रुवारी,२०१३ पर्यंत प्रवेशिका मागविण्यात आलेल्या आहेत. लघुपट (**Short Film ४० मिनिटापर्यंत**) व माहितीपट (**Documentary ६० मिनिटापर्यंत**) या दोन्ही विभागासाठी प्रथम पारितोषिक रु. १ लक्ष, द्वितीय रु. ५० हजार, तिसरे रु. २५ हजार व २ उत्तेजनार्थ प्रत्येकी रु. १० हजार दिले जाणार आहे. पारितोषिक प्राप्त १० लघुपट व माहितीपटांचा महोत्सव, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात मार्च ते एप्रिल २०१३ दरम्यान घेतला जाणार आहे. त्यामुळे रसिकांना नव्या दमाच्या

दिग्दर्शकांचं माहितीपट व लघुपट पाहण्यास मिळतील व नवी प्रतिभा व क्षमता रसिकांपुढे येईल.

**www.filmcitymumbai.com** या वेबसाइटवर स्पर्धेचा संपूर्ण तपशील उपलब्ध आहे.

### ३. माध्यमांतर चर्चासत्र

मराठी चित्रपटसृष्टीत चांगले चित्रपट निर्माण व्हावेत यादृष्टीने उपरोक्त चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. मराठी सिनेमामध्ये वि. स. खांडेकर, आचार्य अत्रे यांच्या साहित्यावर मा. विनायक यांनी चित्रपट निर्माण केले होते व ही परंपरा आजतागायत चालू आहे. परंतु हे प्रमाण वाढण्याची आवश्यकता आहे. कादंबरी आणि चित्रपट यामध्ये बरेच अंतर असते. चांगल्या साहित्यकृतीवरील चित्रपट हे रसिकप्रिय झालेले आहेत. मराठी साहित्यातील महत्त्वाच्या साहित्य कथेवर आधारित चित्रपटांचे सिनेमा माध्यमात रुपांतर करताना काय फरक पडतो याचा तौलनिक अभ्यास करण्यासाठी माध्यमांतर चर्चासत्र ८ शहरात आयोजित करण्यात आलेले आहे. या चर्चेसाठी साहित्यकृतीवर आधारित दर्जेदार चित्रपट व त्याचे मूळ साहित्याशी असलेले नाते यावर चर्चासत्र संबंधित सिनेमाचे दिग्दर्शक, कलावंत आणि मूळ साहित्यकार यांच्या उपस्थितीत चर्चा-सत्र आयोजित करण्यात आलेली आहे. यातून रसिकांना वेगळा दृष्टीकोन मिळेल व साहित्य आणि सिनेमाचे असलेले परस्परांचे महत्त्व लक्षात येईल. तसेच यातून तरुण चित्रपट दिग्दर्शक, पटकथाकार यांची साहित्यावर आधारीत चित्रपट निर्माण करण्याची क्षमता वाढेल.

### ४. पटकथा लेखन कार्यशाळा

कोणत्याही चित्रपटाचा आत्मा उत्कृष्ट पटकथा हा असतो असे म्हटले जाते. पटकथा लेखनाचे तंत्र आणि मंत्र नव्या दमाच्या पटकथाकारांना अवगत व्हावे आणि त्यांच्या हातून सकस, संपन्न, उत्तम बांधणीच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पटकथा निर्माण व्हाव्या यासाठी राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाच्या (एनएफडीसी) सहकार्याने एक पटकथा निर्मिती कार्यशाळा आयोजित केलेली आहे. या कार्यशाळेमध्ये प्रस्ताव मागवून उत्कृष्ट अशा ८ पटकथांची निवड करुन त्यांची कार्यशाळा घेतली जाईल. या कार्यशाळेत पटकथा, तंत्र व मंत्र विकसित क्षमता इ. बाबींबद्दल प्रसिद्ध पटकथाकार आणि आंतरराष्ट्रीय पटकथाकार यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. हे प्रसिद्ध पटकथाकार, पटकथाकारासोबत १५ दिवस राहून चर्चा करुन त्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन करतील व त्यांच्या हातून उत्कृष्ट पटकथा लिहून घेतील व ८ उत्कृष्ट पटकथांचे सादरीकरण एका समारंभात निर्माते दिग्दर्शक यांच्यासमोर केले जाईल. याद्वारे पुढील २-३ वर्षात या ८ पटकथेवर उत्कृष्ट दर्जाचे चित्रपट निर्माण होऊ शकतील व ही शतक महोत्सवानिमित्ताने चित्रपटसृष्टीला दीर्घकाळ परिणाम करणारी भेट ठरू शकेल.

### ४. एनएफडीसीच्या सहकार्याने चित्रपट निर्मिती

राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाचे (एनएफडीसीचे) मुख्यालय, मुंबई येथे असून त्यांचेकडून दरवर्षी २० चित्रपट निर्माण करण्यासाठी अर्थसहाय्य दिले जाते हे लक्षात घेता, उत्कृष्ट मराठी चित्रपट निर्मितीस प्रोत्साहन मिळण्याकरीता दादासाहेब फाळके चित्रनगरी आणि राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळ यांच्यात एक सामंजस्य करार होऊन दरवर्षी ३ मराठी उत्कृष्ट चित्रपटांची निर्मिती केली जाणार आहे. त्यासाठी चित्रनगरीमार्फत प्रत्येक चित्रपटासाठी रु. ५० लाखापर्यंत गुंतवणूक केली जाईल व

**पान १५ वर**



# क्लो• ज• अ• प

-सुधीर नांदगांवकर

## झेक दिग्दर्शक यिरी मेंझील यांचा अमृत महोत्सव

**यिरी मेंझील** हा झेक चित्रपट दिग्दर्शक फिल्म सोसायटी सर्कीटवर भारतात अत्यंत लोकप्रिय चित्रपट दिग्दर्शक आहे. आणि येत्या २३ फेब्रुवारीला तो ७५ व्या वर्षात पदार्पण करत आहे. चित्रपट रसिकांसाठी मेंझीलचे अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण ही एक आनंददायी वार्ता आहे. विशेषत: त्याचा 'क्लोजली गार्डेट ट्रेन्स' हा चित्रपट ज्यांनी पाहिला असेल त्यांना जिरी मेंझील कसा जागतिक दिग्दर्शक आहे याची पूर्ण खात्री



पटेल. मेंझीलचे इंग्रजी स्पेलिंग Iiri असे असले तरी झेक भाषेत त्याचा उच्चार यिरी मेंझील असाच करतात.

यिरी आता ७५ वर्षांचा झाला असला तरी त्याचे मन अजूनही तरुण आहे. नुकताच त्याने 'स्कर्ट चेसर्स' हा नवा चित्रपट पूर्ण केला आहे. माझी त्याची भेट झाली होती.

१९९८ साली मी कार्लोव्ही वेरी आंतरराष्ट्रीय महोत्सवाला गेलो होतो. त्यावेळ पर्यंत मेंझीलचे मी अनेक चित्रपट प्रभात चित्र मंडळ या आमच्या फिल्म सोसायटीत पाहिले होते. १९९८ साली मी मुंबईच्या आंतराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा आर्टिस्टिक डायरेक्ट होतो. तेव्हा कार्लोव्ही वेरी महोत्सवात जर शक्य झाले तर यिरी मेंझीलला भेटून त्याचे चित्रपट मुंबई चित्रपट महोत्सवात 'रिट्रॉस्पेक्टीव्ह' विभागात दाखवावेत असा छुपा अजेंडा माझ्या मनांत होता.

योगायोगाची घटना म्हणजे त्यावर्षी यिरी मेंझील महोत्सवात ग्रॅण्डज्युरीचा चेअरमन होता. तेव्हा त्याला भेटायला मिळेल अशी मला आशा उत्पन्न झाली. मी पत्रकार म्हणून महोत्सवाला गेलेला असल्याने प्रेस डेकवर मी मेंझीलना भेटायचे आहे अशी चिठ्ठी दिली. मला फारशी आशा वाटत नव्हती कारण कोणत्याही आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात ज्युरी सदस्य अन्य प्रतिनिधींमधे फारसे मिसळत नाहीत.

परंतु आश्चर्य म्हणजे तिसऱ्या दिवशी प्रेस डेस्कवरच्या माणसाने मला सांगीतले मेंझील तुम्हाला अमक्या हॉटेलमधे ७वाजता भेटणार आहेत. त्यावेळी डिनरसाठीच त्यांनी तुम्हाला निमंत्रण दिले आहे. (या युरोपियन लोकांचे डिनर सायंकाळी ७ वा. होते आणि सपर रात्री १०वा.)

ठीक सातला १० मिनिटे असतांना पहिल्या मजल्यावरील रेस्टॉरन्ट मधे पोचलो. दरवाजावर मेंझीलची सहाय्यक दिग्दर्शिका मिला रादोवा माझी वाट पहात उभी होती. युरोपियन लोकांच्या गर्दीत भारतीय ओळखायला तिला मुळीच वेळ लागला नाही.

दरवाज्यातच तिने मला सांगीतले मेंझील, त्यांच्या चित्रपटाची तरुण नायिका आणि आणखी एक ज्युरी सदस्य तुमची वाट पहात आहेत.

रेस्टॉरन्ट मधे मधल्या टेबलावर ते तिघे बसले होते आणि हास्य विनोद चालला होता. जेवणाची ऑर्डर मी येईपर्यंत द्यायची नाही असे मेंझीलने आपल्या तरुण मैत्रिणीला सांगितले तिचे नांव आठवत नाही. (याच २० वर्षाच्या अभिनेत्रीशी वयाच्या ७०व्या वर्षी जिरी मेंझीलने लग्न केले.)

मी पोचताच मेंझीलने लगेच झेक व्हिस्की मागविली. मेंझीलला तोडके मोडके इंग्रजी येते. हे तेव्हा मला समजले. म्हणून दुभाष्याचे काम मिला रादोवा करत होती.

मेंझीलना मी भेटण्याचे कारण सांगीतले. मुंबई महोत्सवाचे माझे व्हिजिटींग कार्ड दिले. महोत्सव नोव्हेंबरमधे आहे. तुम्ही येऊ शकलात तर तुमच्या चित्रपटांचे रिट्रॉस्पेक्टीव्ह महोत्सवात करायचे आहे. एक मिनिट मेंझील गंभीर झाले. म्हणाले नोव्हेंबरात माझा नाटकाचा दौरा रुमानियात आहे. त्यामुळे मी कसा येणार? पण पिच्छा पुरवायचेच मी ठरविले होते. यावर्षी नाही तर पुढच्या वर्षी.

मेंझील म्हणाला पुढच्या वर्षी शक्य होइल. तुम्ही मिलाशी संपर्कात रहा आणि जूनच्या आधी मला तारखा कळवा. मी अवश्य येइन.

माझा दुसरा प्रश्न होता. तुमचे महत्त्वाचे चित्रपट कोठे मिळतील?

मेंझीलने सांगीतले झेकनॅशनल फिल्म आर्काइव्हमधे.

यावेळेपर्यंत जेवणाची ऑर्डर दिलेली होती.


क्लोजली गार्डेड ट्रेन्स
मधील मिश्किल दृष्य

ग्लासातली व्हिस्की संपत आली होती. आणि मेंझीलला नऊ वाजताच्या ज्युरी स्क्रीनिंगला जायचे होते. घाईघाईने मेन्झील झेक मधे कांही जिरी बोलला. मला कांहीच कळले नाही मी मिलाला विचारले. ती म्हणाली-जेवणाचा आस्वाद घ्या असे मेंझिल म्हणतोय. जेवणानंतर आमची भेट संपली मेंझील फिल्म पहायला निघून गेले. मुंबईला परतल्यावर पुढच्या वर्षीच्या म्हणजे १९९९च्या महोत्सवात यिरी मेंझीलचे चित्रपट दाखवायचे ठरविले. त्या दृष्टीने कामाला लागलो. झेक फिल्म आर्काव्हिला पत्र लिहले. त्यांनी कळविले. नोव्हे.९९ मधे मेंझीलचे रिट्रास्पेक्टीव्ह अमक्या तमक्या महोत्सवात आहे तेव्हा फिल्म मिळणे शक्य नाही. पुन्हा एक धक्का. पण माझा प्रयत्न मी सोडला नाही.

मुंबईतल्या झेक कान्सुलेटचा कान्सुल जनरल पाझोरिक मेंझीलचा चहाता होता. त्याला मला मदत करायला विनंती केली. त्यानेही लगेच त्याच्या विदेश मंत्रालयाला पत्र लिहले.

**पुन्हा कार्लोव्ही वेरी**

२००० साली मी पुन्हा कार्लोव्ही वेरी महोत्सवात क्रिपेस्की ज्युरी म्हणून गेलो. ते निमंत्रण मिळताच. जिरी मेंझीलला मी येत असल्याचे कळविले मेंझील तेव्हा नव्या चित्रपटाच्या शुटींगसाठी प्रागच्या बाहेर होता. झेक फिल्म आर्काइव्हच्या डायरेक्टरला ई मेल लिहली. त्याचे कळविले जुलै मधे तो चीनला जात आहे. पण त्याच्या असिस्टंटला भेटावे पझोरिकही त्यावेळी प्रागला असणार होता. तेव्हा त्याला घेऊन महोत्सवानंतर प्राग मधील आर्काइव्हला गेलो.

पाझोरिकला नेले हे बरेच झाले. कारण आर्काव्हच्या त्या सहाय्यक संचालक बाईला इंग्रजीचा गंध नव्हता पाझोरिकच्या सहाय्याने ७ चित्रपट निश्चित केले.

२०००च्या महोत्सवात २ वर्षाच्या खटपटीनंतर मेंझीलच्या ७ चित्रपटांचे रिट्रॉस्पेक्टीव्ह झाले. प्रेक्षकांनी प्रचंड गर्दी केली. दिग्दर्शक यश चोप्रा प्रत्येक चित्रपटाला यायचे. शेवटच्या दिवशी मेंझीलच्या चित्रपटावर खूष होऊन त्यांनी माझी पाठ थोपटली. पण....

यिरी मेंझील आलाच नाही बाथरूममधे पडल्याने

त्याच्या मांडीचे हाड मोडले होते. आणि प्लास्टर घालून त्याला महिनाभर अंथरूणाला खिळून रहावे लागले. त्याची सहाय्यक मिला रादोवा आली. रोज संध्याकाळी ती मेंझीलला मोबाइलवरून रिपोर्ट कळवायची.

शेवटच्या दिवशी मेंझिलने तिला माझे आभार मानायला सांगीतले.

## विलक्षण प्रतिभेचा दिग्दर्शक

यिरी मेंझीलचा जन्म २३ फेब्रुवारी १९३८ ला प्राग मधे झाला. विसाव्या वर्षी कॉलेज संपवून यिरी मेंझील यांनी प्राग फिल्म इन्स्टिट्यूटमधे चार वर्षे दिग्दर्शनाचे प्रशिक्षण घेतले. इन्स्टिट्यूट मधून बाहेर पडल्यावर व्हेरा चितलोव्हा या दिग्दर्शिकेचा सहाय्यक म्हणून काम केले. या काळात नाटकात भूमिका करणे आणि नाटके दिग्दर्शित करणे चालूच होते. चितलोव्हाच्या चित्रपटात छोट्या छोट्या भूमिकाही केल्या.

झेकोस्लोवाकियात तेव्हा कम्युनिस्ट राजवट होती. त्यामुळे चित्रपट व्यवसाय शासनाच्या ताब्यात होता. स्वाभाविकच चित्रपटासाठी भांडवल मिळवायची कटकट नव्हती. पण शासनाची सेन्सॉरशीप कडक होती. या सगळ्यातून मेंझील यांना 'क्लेजली गार्डेड ट्रेन्स' हा पहिला चित्रपट करायला मिळाला. मेंझीलचा पटकथाकार बोहुमिल ऱ्हबल त्याच्या बरोबर होता. युरोपात साठच्या दशकातला तो काळ दुसऱ्या महायुद्धावरील चित्रपट निर्माण करण्याचा होता. एकूणच जीवनाकडे पहाण्याचा मेंझिलचा दृष्टीकोण हसत खेळत पहाण्याचा होता. जीवनांतील संघर्षाला आपण हसत खेळात तोंड देण्यात पराक्रम आहे. असा मेंझीलचा दृष्टीकोण क्लोजली गार्डेड ट्रेन्स मधे आहे.

चित्रपटाला दुसऱ्या महायुद्धाची पार्श्वभूमी आहे. झेकोस्लोवाकिया हिटलरच्या टाचेखाली होता. जर्मनद्वेष समाजात पक्का रुजला होता. पण युद्धाकडे मेंझील हसत खेळत पहातो. त्यामुळे हिटलरच्या सैन्याचे क्रौर्य चित्रपटात नाही.

'क्लोजली गार्डेड ट्रेन्स' चित्रपटाला १९६७चे ऑस्कर मिळाले. झेक सिनेमाला मिळालेले हे दुसरे ऑस्कर. पहिले एक वर्ष आधी 'शॉप ऑन दि में स्ट्रीट'ला मिळाले होते.

ऑस्कर मिळाल्यानें मेंझीलकडे साऱ्या जगाचे लक्ष लागले. १९६८ साली रशियन रणगाडे झेकोस्लोवाकियात घुसले. तेव्हा मिलास फोरमन, कादर क्लास असे लोकशाहीचे पुरस्कर्ते दिग्दर्शक अमेरिकेत पळून गेले. पण मेंझील गेला नाही. 'स्कायलार्क (१९७०) या त्यांच्या चित्रपटावर बंदी आणण्यात आली पण सरकारने त्याला पुढील चित्रपटासाठी भांडवल पुरविले.

मेंझील माय देशातच चित्रपट दिग्दर्शित करत राहिला. आंतर राष्ट्रीय चित्रपट महोत्सवात त्याला अनेक मानसन्मान मिळाले. जागतिक सर्वोत्तम १० दिग्दर्शकात त्याची गणना होऊ लागली. 'कॅप्रीशियस समर', 'सेक्लूजन निअर फॉरेस्ट', 'क्राइम इन म्युझिक हॉल', 'दोज मॅग्नीफिशंट मेन इन देअर क्रॅकिंग मशींन', 'माय स्वीट लिटील व्हिलेज' असे २१ चित्रपट त्याने १९६६ ते २००६ या चाळीस वर्षात दिग्दर्शित केले. १९९०नंतर झेक रिपब्लीक मधे लोकशाही सरकार आले. कम्युनिस्टांची सत्ता संपली. चित्रपट व्यवसाय खाजगी क्षेत्रात आला. त्यामुळे चित्रपटासाठी भांडवल मिळवायची समस्या उभी राहिली. १९९३ला 'ॲडव्हेंचर्स ऑफ प्रायव्हेट इव्हान चोन्कीन' दिग्दर्शिन केल्यानंतर मेंझीलचा पुढचा चित्रपट २००६ साली आला 'आय सर्व्हेड दि किंग ऑफ इंग्लंड' हा चित्रपट त्याचवर्षी

(पान १६ वर)

# हिचकॉक नावाचा विलक्षण 'माणूस'

– अपर्णा पाटील

**सर आल्फ्रेड हिचकॉक हा रहस्यपटांचा बादशहा म्हणून जगभर ओळखला जातो. त्याच्या निधनानंतरही त्याची लोकप्रियता कमी झालेली नाही.**

**हिचकॉक मधला माणूस चितारणारे एक नव्हे तीन चित्रपट येऊ घातले आहेत.**

**एका** पाच वर्षाच्या मुलाला त्याच्या वडिलांनी एक चिठ्ठी देऊन पोलिस स्टेशनला पाठवलं. त्या चिठ्ठीत काय लिहिलंय, हे मुलाला माहिती नव्हतं. मुलाने ती चिठ्ठी पोलिसांकडे दिली. त्या चिठ्ठीत, या मुलाला काही मिनिटांसाठी जेलमध्ये टाका आणि त्याला धाक दाखवा, असं लिहिलं होतं. जेलमधल्या पाच मिनिटांनी त्या मुलाचं अवघं जगच बदललं. भीती नावाची गोष्ट काय असते, हे त्याने अनुभवलं होतं. हाच अनुभव त्याने पुढच्या आयुष्यात जगाला वारंवार दिला. सर आल्फ्रेड हिचकॉक नावाच्या दिग्दर्शकाच्या आयुष्यातला हा किस्सा अनेकदा ऐकवला जातो. हिचकॉकच्या आयुष्यातल्या त्या पाच मिनिटांनी अर्ध शतक पडद्यावर मूर्तिमंत भीती उभी केली.

त्याच्या सस्पेन्स सायको-थ्रीलर सिनेमांचे वेगवेगळ्या प्रकारे पोस्टमॉर्टेम केलं तर हिचकॉक काय हेही जाणून घेता येतं. पण हिचकॉकचं मानसशास्त्र नेमकं कसं होतं, याविषयीचं गूढ सिनेमाप्रेमींच्या उत्कंठेचा विषय ठरला आहे.

ब्रिटीश दिग्दर्शक म्हणून हिचकॉकच्या कारकिर्दीची सुरुवात लंडनमध्ये झाली. ब्रिटनमध्ये मूकपट आणि बोलपट गाजवलेल्या हिचकॉकने हॉलिवूड गाठलं आणि गाजवलंही. सायको-थ्रीलर सिनेमातला हा बापमाणूस. त्याने तब्बल सहा दशके गाजवली. ब्रिटीश असलेल्या या दिग्दर्शकाने हॉलिवूडमध्येही दबदबा कायम ठेवला. त्याचा प्रभाव असलेले दिग्दर्शक जगात कमी नाहीत. अगदी स्टीव्हन स्पिलबर्गपासून मार्टीन



स्कोरर्सिस, ख्रिस्तोफर नोलन, एम. नाइट श्यामलन, टीम बर्टन, मेल ब्रूक्स, डेव्हिड फिन्चर यासारख्या दिग्दर्शकांनी आपल्यावर हिचकॉकचा पगडा असल्याचं मान्य केलं आहे. हिचकॉकचं यश हे अनेक दिग्दर्शकांना हेवा वाटायला लावणारं आहे. त्याहीपेक्षा त्याच्यासारखी तंत्रावर हुकूमत मिळवणं हेही अनेकांचं लक्ष्य असतं. तसे प्रयत्न होत असतात. इतकंच नाहीतर त्याच्या सिनेमाच्या कॉप्या करण्यातही अनेकांना धन्यधन्य झाल्यासारखं वाटतं.

हिचकॉकचा सिनेमा जुना झालाय, असं वाटत नाही. त्यातलं तंत्र, कॅमेरा, साऊंड या सगळ्या गोष्टी अगदी काल रेकॉर्ड करून ठेवल्यात इतक्या ताज्या आहेत. अनेक दिग्दर्शकांना हिचकॉकच्या दिग्दर्शकीय कसबाच्या जवळही जाणं जमलेलं नाही, विचार करा, 'सायको' या एकाच सिनेमाच्या चार-पाच आवृत्या आल्यात. पुन्हा पुन्हा त्यातले प्रसंग तसेच्या तसे शूट करण्यात आले, पण हिचकॉक इफेक्ट त्यांना साधता आलेला नाही. दिग्दर्शक म्हणून, लेखक, संकलक म्हणून त्याचा हात धरावा, असा कोणीही आजवर झाला नाही. त्याच्या कथांमधील नावीन्य यामुळे लेखक म्हणूनही त्याला श्रेष्ठ मानलं गेलं. त्याच्या लोकप्रियतेच्या पसाऱ्यात आणि त्याच्या शोमनशीपच्या झळाळीत त्याच्यातलं माणूसपण नेहमीच झाकलं गेलं, दबलं गेलं.

हिचकॉकच्या स्वभावातल्या नकारात्मक गोष्टींची चर्चा झाली. पण त्याच्या सिनेमांच्या यशापुढे ते दुय्यम मानलं गेलं. अर्थात त्याच्या स्वभावाचा जवळच्यांना अतिशय त्रास झाला, पण त्याचं श्रेष्ठत्व सहजपणे मान्य केलं गेलं. हिचकॉकच्या माणूस असण्याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न लेखक, दिग्दर्शकांनी यापूर्वीही केला आहे. पण आता त्यातला तळ शोधण्याचा प्रयत्न होतोय. हे म्हणण्याचं कारण असं की, डिसेंबरमध्ये हिचकॉकच्या आयुष्यावरचे दोन सिनेमे हॉलिवूडमध्ये रिलीज झाले. 'हिचकॉक' आणि 'द गर्ल'. दोन्ही चित्रपट हिचकॉकमधल्या दिग्दर्शकापेक्षा माणसाला शोधण्याचा प्रयत्न करणारे आहेत. 'हिचकॉक' हा सिनेमा अँथनी हॉफकिन आणि हेलन मिरन यांचा.

'हिचकॉक'हा सिनेमा हिचकॉकचा चरित्रपट नाहीये तर 'सायको' नावाच्या सिनेमाच्या मेकिंगची कहाणी आहे, तर 'द गर्ल', 'सायको' मधल्या एका सहाय्यक अभिनेत्रीचा मुख्य अभिनेत्री होण्याच्या प्रवासात हिचकॉकच्या पुरुष म्हणून वागण्याचा आलेख आहे. जणू दोन्ही सिनेमा म्हणजे सिक्वेल म्हणावेत असे! तर पुढच्या वर्षी म्हणजे २०१४ मध्ये ग्रेस केली या हिचकॉकच्या लाडक्या अभिनेत्रीवरचा 'ग्रेस ऑफ मोनॅको' रिलीज होणार आहे. निकोल किडमन त्यात ग्रेसची भूमिका करतेय. या सिनेमाच्या निमित्ताने पुन्हा एकदा हिचकॉक पडद्यावर दिसणार आहे. ग्रेसच्या कारकिर्दीत हिचकॉकचा वाटा मोठा होता. तो प्रत्येक नव्या अभिनेत्रीत ग्रेसला शोधत असे आणि तिच्यासारखी स्टार बनवण्याचं जाहीरपणे बोलूनही दाखवत असे. मनावरून भिती नावाची गोष्ट पुसणं कधी शक्य नसतं. पण नेमका याचाच अनुभव देत मानसशास्त्रीय धक्के देण्याचं काम केलं ते हिचकॉकच्या सिनेमाने. हिचकॉकने एकाहून एक असे सिनेमे दिले. पण 'सायको' त्याच्या कारकिर्दीतला सगळ्यात यशस्वी सिनेमा ठरला. त्याचं यश हे त्याने कमावलेल्या गल्ल्यात नव्हतं, तर त्याच्या प्रभावात होतं. हा सिनेमा हिचकॉकला का करावासा वाटला, याचं कारण त्याच्या स्वभावात होतं. त्याचवेळी त्याच्या आयुष्यातल्या घटनांनी एक वेगळंच वळण घेतलं होतं. ते नेमकं कायं होतं, ते समजतं ते 'हिचकॉक' नावाच्या

सिनेमातून.

'हिचकॉक' हा सिनेमा सुरू होतो, तेव्हा त्याच्या 'नॉर्थ बाय नॉर्थवेस्ट'ला प्रेक्षकांची गर्दी झालेली दिसते. साठीला पोहोचलेल्या दिग्दर्शक हिचकॉकला त्याचा प्रत्येक सिनेमा हिट होणार याची खात्री असते. सिनेमाचं हिट होणं, हे पुढच्या सिनेमासाठी ग्रीन सिग्नल असल्याचं मानून तो तयारीला लागणार असतो. नेमक्या त्याचवेळी त्याच्या सिनेमावरचे समीक्षण करताना, हिचकॉकने निवृत्त होण्याची हीच योग्य वेळ आहे, असं पत्रकारांनी सुचवणं, हिचकॉकच्या जिव्हारी लागतं.

खरं तर 'कसिनो रोयाल' हा बाँडपट करण्याची ऑफर त्याच्याकडे आलेली असते. असं असतानाही रॉबर्ट ब्लॉशच्या 'सायको' कादंबरीवर आपण सिनेमा करणार असल्याचं तो जाहीर करतो. एड जिन या सिरीअल किलरवर आधारित नॉर्मन बेट्स या खून्याची व्यक्तिरेखा त्या कादंबरीत लेखकाने रंगवलेली होती. त्याची पत्नी अल्मा मात्र व्हाइटफिल्ड कूक याची पटकथा त्याने स्वीकारावी, अशा प्रयत्नात असते. पण हिचकॉक ठाम असतो. हिचकॉक आपलं ऐकत नाही म्हटल्यानंतर अल्माने व्हाइटफिल्डच्या पटकथेत रुची घेणं, त्याला पटत नाही. त्याचं अनेक अभिनेत्रींमध्ये गुंतणं जणू स्वाभाविक होतं, पण अल्माने त्याच्याशी प्रतारणा करणं त्याला रुचत नाही. पत्नीच्या या वागण्याने अस्वस्थ झालेला हिचकॉक ते सायकोच्या यशाबाबत बोलताना अल्माला श्रेय देण्यापर्यंतचा ठळक प्रवास 'हिचकॉक' सिनेमातून समजून घेता येतो.

हिचकॉकचे सिनेमे ज्याने पाहिलेत, त्या प्रत्येकाला आपण एका गुदमरत्या खोलीत अडकलोय आणि त्यातून बाहेर पडण्याचे प्रयत्न करूनही त्यात यशस्वी न झाल्याने अगतिक झाल्याचा अनुभव घेतलाय. कदाचित लहानपणीच्या शिक्षेच्या त्या पाच मिनिटांमध्ये हिचकॉकला आलेल्या अनुभवाचा पुन:प्रत्यय सिनेमाच्या वेळी तो प्रत्येक वेळी घेत असावा. 'सायको'मधील शॉवर प्रसंग त्यापैकीच एक. अनेक अँगलमध्ये कॅमेरे लावत, त्या प्रसंगात हवा तो इफेक्ट मिळावा, यासाठी हिचकॉकने काय युक्त्या लढवल्या, त्या पाहता येतात. पण त्याहीपेक्षा थिएटरमधे जेव्हा 'सायको'चा शो पाहायला प्रेक्षक आलेले असतात, तेव्हा शॉवर प्रसंग पाहणं अधिक रोमांचक झालं आहे. त्या




पान १४ वर

प्रसंगावर प्रेक्षकांची प्रतिक्रिया आजमावयाला हिचकॉक थिएटरच्या दाराबाहेर उभा राहतो. आत प्रेक्षक भीतीने गारठलेत आणि त्या खूनाच्या प्रसंगातल्या संगीतावर हिचकॉक प्रेक्षकांच्या अपेक्षित प्रतिक्रियेने अत्यानंदित होऊन मस्त झुलतोय, हे दृश्य इतकं अप्रतिम की कायम लक्षात राहावं!

'हिचकॉक'या सिनेमात सगळ्यात जमून काय आलं तर ते अँथनी हाफकिनचं व्यक्तिरेखेत शिरणं. संपूर्ण सिनेमाभर तो अँथनी हाफकिन आहे, हे लक्षातही येत नाही. थोडा स्थूलपणा कमी आहे, असं वाटतं पण तेही किंचीत. हिचकॉकच्या भूमिकेत अँथनी हाफकिन शिरलाय खरा, पण सिनेमात भाव खाऊन गेलीय ती हेलन मिरन.

हिचकॉकची छाया बनून वावरणारी अल्मा रंगवताना हेलन रंगून गेली आहे. एका प्रसंगात, ती हिचकॉकबरोबर वावरताना अनेकदा लोक तिच्याकडे जणू तिथे ती नसल्यासारखं पाहतात, वागतात, अशा आशयाचा संवाद म्हणते. तेव्हा जगातल्या अनेक बायकांना त्यांच्या लोकप्रिय पतीसोबत वावरताना नेमकं असंच वाटत असणार याची जाणीव खूप तीव्रपणे हेलन करून देते. हेलनचं पटकथाकारात गुंतणं आणि तरीही हिचकॉकच्या प्रत्येक गोष्टीला निष्ठापूर्वक साथ देणं, हे हेलन खूप सहजपणे सादर करते. खरं तर ती उत्कृष्ट दिग्दर्शक आहे. हिचकॉक अतिश्रमामुळे आजारी पडल्यानंतर 'सायको'ची सूत्र स्वत:च्या हातात घेतलेली अल्मा दिग्दर्शक मात्र एकच, असं सांगून हिचकॉकला मोठेपणा देऊ करते. अल्मा जी स्वत:ही एक उत्तम दिग्दर्शक, पटकथा लेखक आणि संकलक आहे, हिचकॉकच्या सिनेमाचा महत्त्वाचा भाग आहे, पण हिचकॉक त्याचं श्रेय तिला कधीच देत नाही. तरीही त्याला योग्य सल्ला आणि सहकार्य करण्याचं काम ती निष्ठेने करतेय. हिचकॉक आणि तिच्या नात्यातला हा वेगळा पदरही या निमित्ताने उलगडला गेला आहे. हिचकॉक स्त्रियांच्या बाबतीत सॅडिस्ट वृत्तीचा होता. पडद्यावर आपली हिरॉइन कशी दिसावी, याबाबत तो कमालीचा दक्ष असे. तिचे लुक्स, कपडे आणि फिगर कशी असावी, याविषयी त्याची विशिष्ट आवड होती. 'सायको'तल्या प्रमुख भूमिकेसाठी निवड करताना तो अभिनेत्रीची जेव्हा निवड करतो, तेव्हा त्याने तिला स्टुडिओच्या खिडकीतून पाहिलेलं असतं. सिनेमात ही भूमिका स्कार्लेट जॉन्सनने केली आहे. स्कार्लेट सिनेमात अप्रतिम दिसली आहे. पण यात 'सायको'त सहायक भूमिका करणारी जेसिका अल्बाही तितकीच महत्त्वाची कलाकार आहे.

हिचकॉकच्या सिनेमाच्या तंत्रात भीतीच्या दिशेने प्रेक्षकाने प्रवास करावा, यासाठी काही गोष्टी योजल्या जातात. यात डोळ्यांवर कॅमेरे रोखणं, कॅमेरा आणि संगीत यांची जणू जुगलबंदी सुरू असा भास उभा करणं. घटनेपेक्षा जुगलबंदी सुरू असा भास उभा करणं. घटनेपेक्षा त्याचा परिणाम अधिक प्रभावी करणं, हे तंत्र हिचकॉकच्या सिनेमात असतं. त्याच्यावरचा सिनेमा करताना या तंत्रालाही स्थान दिलं आहे.

हिचकॉकचा सेन्स ऑफ ह्यूमर हाही एक चर्चेचा विषय होता. यात निर्माता जेफ्री शेरलॉकला 'सायको'ची कथा पटलेली नसते. त्यामुळे अनेक अटी टाकण्याचा तो प्रयत्न करतो. सिनेमाच्या कराराची बोलणी करायला आलेला हिचकॉक आणि शेरलॉक यांच्यातला संवाद या स्वभाववैशिष्ट्याची ओळख करून देण्यासाठी पुरेसा आहे. सिनेमा कसा चालवावा, हे हिचकॉकला पक्क माहिती होतं. आज ज्याला आपण मार्केटिंग म्हणतो किंवा जाहिरातबाजी म्हणतो, त्यातही तो बापच होता.

पान १६ वर

**पान ४ वरून**

उर्वरित भांडवल राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळ आणि संबंधित निर्माता घालील. उच्च कलात्मक व आंतरराष्ट्रीय संवेदनशील चित्रपट निर्मिती कोणतीही कलाबाह्य तडजोड न करता व्हावी व त्याचे प्रदर्शन विविध आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात व्हावे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. या निमित्ताने दरवर्षी राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळ व चित्रनगरीच्या भागीदारीतून किमान ३ उत्कृष्ट चित्रपट होतील. त्याद्वारे नव्या दमाचे दिग्दर्शक, पटकथाकार व निर्माते मराठीसाठी मिळतील व ते आगामी काळात आपल्या कर्तृत्वाने मराठी चित्रपटसृष्टीला नवे वळण देऊ शकतील. मा. देवताळे पुढे म्हणाले, चित्रपट महोत्सवांना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने १० शहरातील चित्रपट महोत्सवांना प्रत्येकी ५ लाख रुपये निधी देण्याचे ठरविले आहे. हा सर्व कार्यक्रम फाळके चित्रनगरी आणि सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्या मार्फत राबविला जाणार असून महाराष्ट्र शासनाने यासाठी दीड कोटी रु. चा निधि उपलब्ध करून दिला आहे. पत्रकार परिषदेत मा.मंत्री यांच्यासमवेत फिल्मसिटीचे व्यवस्थापकाचे संचालक लक्ष्मीकांत देशमुख, सांस्कृतिक कार्यसंचालक आशुतोष घोरपडे, कोल्हापूर चित्रनगरीचे संचालक संजय पाटील व मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष सुर्वे उपस्थित होते.

**महत्त्वाच्या घटना**

- ३मे १९१३ या दिवशी दादासाहेब फाळके निर्मित दिग्दर्शित 'राजा हरिश्चंद्र' हा भारताचा पहिला मूकपट मुंबईच्या कॉरोनेशन थिएटर मधे प्रकाशित झाला. येथून भारतीय चित्रपट निर्मितीला आरंभ झाला म्हणून २०१२-२०१३ हे वर्ष सिनेमा जन्म शताब्दी वर्ष मानले जाते.
- त्याआधी १९ मे १९१२ या दिवशी कॉरोनेशन थिएटरमधेच दादासाहेब तोरणे दिग्दर्शित 'पुंडलिक' हा मूकपट प्रकाशीत झाला. पण तो मूकपट हे किर्तीकरांच्या 'पुंडलिक' नाटकाचे चित्रीकरण होते.
- दादासाहेब फाळकेंची जन्मशताब्दी १९७० मधे होती. महाराष्ट्र शासनाने ती मोठ्या प्रमाणावर साजरी केली. (दादर) मुंबई येथे फाळकेंनी ज्या मथुरा भवन मधे 'राजा हरिश्चंद्र' निर्माण केला. त्या रस्त्याला फाळके मार्ग असे नांव देण्यात आले.
- या रस्त्याच्या एका टोकाला हिंदमाता सिनेमा समोर जन्मशताब्दी निमित्त फाळक्यांचा पुतळा बसविण्यांत आला आहे.
- गोरेगांवच्या शासकीय फिल्म सिटीला 'फाळके चित्रनगरी' असे नांव देण्यात आले.
- महाराष्ट्र शासन १९६२ पासून मराठी चित्रपटांनाजी पारितोषिके देते ती फाळक्यांच्या जन्मदिनी म्हणजे ३० एप्रिलला दरवर्षी देते.
- १९७०साली प्रभात चित्र मंडळाच्या प्रयत्नांतून फाळके यांच्या 'राजा हरिश्चंद्र'ची रिळे मिळवून ती पुण्याच्या नॅशनल फिल्म आर्काइव्ह मधे ठेवण्यात आली. सिनेमा जन्म शताब्दी निमित्त आर्काइव्हने त्याच्या डिव्हीडी प्रकाशीत केल्या आहेत. त्या कोणाही रसिकाला अल्प किमतीत उपलब्ध होऊ शकतात.
- सिनेमा जन्मशताब्दी सोहळा मुंबईत बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्समधे २ मेला आयोजित करण्यात आला आहे. या सोहळयातच यावर्षीच्या चित्रपट पारितोषिकांचे वितरण करण्यात येईल.
- योगायोग म्हणजे सिनेमाची जन्मशताब्दी साजरी होत असतांना शासनाच्या मराठी चित्रपट पारितोषिक उपक्रमाला ५० वर्षे पूर्ण होत आहेत.

**पान ८ वरून**

मुंबई महोत्सवात मी दाखविला त्यानंतर आता ६ वर्षानंतर 'स्कर्ट चेयर्स' हा मेंझीलचा नवा चित्रपट येतो आहे. ऑपेरा डान्सरची पार्श्वभूमी असलेला हा नवा चित्रपट मार्च मध्ये प्रकाशीत होणार आहे.

या मधल्या काळात मेंझील स्वस्थ बसलेला नव्हता. तो रंगमंचावर नाटके करायचा. पूर्वयुरोपात नाटकाचे दौरे करायचा. नाटकात भूमिका करायचा.

हसत खेळत जीवन जगा हा त्याच्या प्रत्येक चित्रपटाचा संदेश असायचा. विनोद हा त्याचा स्थायीभाव. 'दोज मॅग्नीफिशंट मेन इन देअर क्रॅकिंग मशींन', या गाजलेल्या हॉलीवूड विनोद पटाचे बहारदार विडंबन त्याने आपल्या 'दोज वंडरफूल मेन इन देअर फ्लायिंग मशींन', या चित्रपटाता केले होते.आता वयाच्या पंचाहत्तरीत प्रवेश करतांना 'स्कर्ट चेयर्स' पूर्ण झाल्यानतंर लगेचच त्याला पुढचा चित्रपट करायचा आहे. शरीर थकायला लागले तरी यिरी मेंझीलचे मन अजूनही हिरवेच आहे. मराठी चित्रपट रसिकांनी या रंग उमलत्या मनाच्या दिग्दर्शकाचे चित्रपट पहायला हवेत. ●

---

**पान १३ वरून**

उ. अपेक्षा (Expectations) चित्रपटाने मनोरंजन करावे, उद्‌बोधन करावे, कलानंद द्यावा. आपण चित्रपटाकडून काय अपेक्षा करतो यावरही आपला त्या कलेचा अनुभव अवलंबून असतो.

तेव्हा चित्रपटाचे वाचन प्रगल्भ व्हायचे असेल तर चित्रपट माध्यमाचा वाचक (प्रेक्षक) म्हणून आपल्यालाही त्या प्रगल्भतेच्या दिशेने तयारी करायला हवी. सिनेमा स्टडीज हे शास्त्रही त्याच दिशेने टाकलेले पाऊल आहे. ●

**पान १४ वरून**

'सायको' विषयी उत्सुकता वाढावी, म्हणून त्याने सायको पुस्तकाच्या सगळ्या प्रती स्वत:विकत घेतल्या होत्या. सायकोमधील प्रमुख व्यक्तिरेखा सिनेमाच्या मध्यावधीला मरणार म्हटल्यावर प्रेक्षकांना पुढच्या सिनेमात काय रस उरणार, हा प्रश्न त्याच्या पत्नीने त्याला विचारलेला असतो. त्यामुळेच पुढे काय घडते, हे प्रेक्षकाला आधी समजून द्यायचं नाही, असा चंग त्याने बांधला होता. शिवाय आज आपण, सुरुवात सांगू नका आणि शेवट चुकवू नका, अशा जाहिराती पाहतो आणि त्या फारशा मनावर घेत नाही. पण 'सायको' पाहण्यास येणाऱ्या प्रेक्षकांसाठी त्याने एक जाहिरात दिली होती, त्यात एकदा का थिएटरमध्ये सिनेमा सुरू झाला की, कोणालाही प्रवेश देता येणार नाही, अशी धमकीवजा सूचना प्रेक्षकांना दिली होती. धमकी वाटावी अशा हिचकॉकच्याच आवाजात रेकॉर्ड केलेली तशी अनाऊसमेंटही थिएटरबाहेर केली जायची. या जाहिरातीतलं शेवटचं वाक्य असं होतं, कोणालाही प्रवेश मिळणार नाही, मग ती व्यक्ती थिएटर मालकाचा भाऊ, अमेरिकेचे अध्यक्ष असो नाही तर इंग्लंडची राणी. हिचकॉकने हे करताना सिनेमा एन्जॉय करावा, एवढीच अपेक्षा होती. अर्थात प्रेक्षकांची भीतीने गाळण उडावी, हीच हिचकॉकची मनोरंजनाची कल्पना होती, हे विशेष. हिचकॉकचे सिनेमे अनुभवणे हे ज्याप्रमाणे रोमांचक अनुभव असतात, तसा 'हिचकॉक' सिनेमाही. हा सिनेमा पाहण्यासाठी अनेक कारणं असतील, त्यात अँथनी हॉफकिनचं हिचकॉक साकारणं असेल, हेलन मिरनचे अल्माची अविस्मरणीय भूमिका करणं असेल, 'सायको'चा प्रवास कसा झाला हे पाहणं असेल. त्याहीपेक्षा हिचकॉकविषयी वाटणारं प्रेम हेही असेल. त्यामुळेच हा सिनेमा पाहणं हे आवश्यकच असेल. ●

# बालक-पालक

**दिग्दर्शक रवी जाधव,**

पटकथा-अंबर हडप व विनोद पंडित,

छाया-महेश लिमये

संगीत-विशाल शेखर

**'लैंगिक शिक्षण'** हा शब्द उच्चारतात आपल्याकडे दोन तट पडतात. लैंगिक शिक्षणाची गरजच काय? आम्हाला कुणी दिलं होतं का? आमच नाही का सगळं काही नीट झालं? अशा युक्तीवादापासून पुढची पिढी घडवायची असेल तर लैंगिक शिक्षण द्यायलाच हवं या मतापर्यंतचे अनेक सूर आपल्या समाजात निघत असतात. वयात येणाऱ्या मुलाला लैंगिक शिक्षण मिळणं कसं गरजेचं आहे, पालकांनी त्यांच्या भावना समजून घ्यायला हव्यात हे सांगणारी उपदेशपर व्याख्यानं चर्चासत्र आणि लेखापेक्षाही चित्रपटासारख्या अधिक प्रभावी माध्यमातून ते पोहचवण्याची गरज असण्याच्या टप्प्यावर समाज असतांना रवि जाधव यांनी 'बालक-पालक-बी.पी.' चित्रपटातून या विषयाला हात घातल्याबद्दल त्यांचं अभिनन्दन करायला हवं. सेक्सच चित्रण करून प्रेक्षकांच्या लैंगिक भावना चेतवण्याचं काम चित्रपट घाऊकपणे करत असताना ज्या विषयावर आपण मोकळेपणाने परस्पराशी बोलूच शकत नाही अशा नाजुक विषयावर 'बालक-पालक' मध्ये थेटपणे लैंगिक दृश्य न दाखवता भाष्य केल गेलंय म्हणून हा चित्रपट महत्त्वाचा आहे.

रवि जाधव यांच्या आधीच्या 'नटरंग' व 'बालगंधर्व' या दोन्ही चित्रपटात लैंगिकतेच आशयसूत्र होते. बी. पी. हा त्यापुढील प्रयत्न आहे. दिग्दर्शकाने सातत्याने एका संकल्पनेवर वेगवेगळ्या कल्पक शैलीतले चित्रपट देणं हे कौतुकात्पद आहे. 'बालक-पालक', पौगंडावस्थेतील मुलाच्या मनात सेक्स बद्दल जाणून घेण्याची निर्माण झालेली नैसर्गिक ऊर्मी, उत्सुकता व ती शमवण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न, या आशयसूत्राच्या मर्यादित परिघात फिरतो. चित्रपटाचा आशय कालसुसंगत असला तरीही तो चित्रपट माध्यमातून तितक्याच परिणामकारक पणे व्यक्त होतो का? यावर त्या चित्रपटाचे मूल्य ठरत असते. 'बालक-पालक'चा चित्रपट म्हणून विचार करताना दिग्दर्शकाने केलेली त्याची मांडणी



त्यातील व्यक्तिरेखाचा आलेख आधी लक्षात घेऊ.

चित्रपटाची सुरुवात, अविने आपल्या मुलाला पोर्नो फिल्म्स जवळ बाळगल्याबद्दल दिलेल्या माराने होते. अविच्या या कृत्याने व्यथित झालेल्या त्याच्या बायकोला आपले पौगंडावस्थेतील दिवस आठवतात.

'बालक-पालक'ची मुख्य कथा घडते ऐंशीच्या दशकात! अवि, माया, चिऊ व डॉली ही एकाच वर्गात शिकणारी. एकत्र हुंदडणारी, अभ्यास करणारी मुल. त्याच्या चाळीतल्या ज्योती ताईने शेणं खाल्ले म्हणून तिला शहराबाहेर नेले जाते. शेण खाणं म्हणजे नक्की काय? याचा शोध घेताना या चार मुलांना सेक्सबद्दल व स्वत:च्या लैंगिकतेबद्दल जाणीव निर्माण होते. यात त्यांना मदत मिळते ती विशू नावाच्या त्यांच्या वर्गमित्राची. विशूने दिलेली पिवळी पुस्तके वाचण्यापासून सुरु झालेला हा प्रवास, दाम्पत्याचा प्रणय चोरून पाहणे व व्हिडिओ कॅसेटवर बी.पी. पाहण्यापर्यंत पोहचतो. त्यानंतर मात्र ही चारही मुलं. आपापल्या संस्कारानुसार व त्यातून घडलेल्या मानसिकतेनुसार त्यांच्या लैंगिक जाणीवांना सामोरी जातात. सेक्स ही आयुष्यातील महत्त्वाची व सुंदर गोष्ट आहे. मात्र ती प्रगल्भपणे समजून घेतली पाहिजे असा सल्ला त्यांना कदम काका व नेहाताई कडून मिळतो. 'बालक-पालक'चा पूर्वार्ध हा अवि. भाग्या, चिऊ, डॉली व विशू या मुलांच्या व्यक्तिरेखा उभा करतो. या व्यक्तिरेखा उभ्या करण्यासाठी दिग्दर्शकाने छोटे-छोटे प्रसंग खुमासदार संवादातून उभे केले आहेत. ऐंशीच्या दशकात तेजीत असलेल्या व्हिडिओ कॅसेटचा धंदा व मुलाची पैसे गोळा करून गुपचूप एखाद्या मित्राच्या घरी व्हिसीआर आणून बीपी पाहणे या त्याकाळातील प्रचलित व्यवहाराचा चपखल उपयोग दिग्दर्शकाने करून घेतलाय. भाग्याला नेहाताईबद्दल वाटणारे शारिरीक आकर्षण, अविच्या मनात चिऊबद्दल निर्माण झालेलं प्रेम, या घटनातून मुलांच भावविश्व दिग्दर्शकाने नेमकेपणाने मांडलंय. यात त्याला पटकथा व संवाद लेखक गणेश पंडित आणि अंबर हडपची छान साथ मिळाली आहे. मात्र हे सगळं चितारताना पालक व्यक्तिरेखांकडे दिग्दर्शकाचा दुर्लक्ष झालंय. मुलांच्या जडणघडणीत पालकांचा असलेला सहभाग, मुलांच भावविश्व जाणून घेताना पालकांना येणाऱ्या अडचणी यावर हा चित्रपट कुठेच भाष्य करत नाही. त्यामुळे हा केवळ बालक केन्द्री चित्रपट झाला आहे. पूर्वार्धात मुलांच्या हालचालीवर पाळत ठेवणारे कदम काका अचानकपणे त्यांना समजुन घेण्याचा पवित्रा घेतात व त्यांना लैंगिक शिक्षणाबद्दल उपदेशाचा डोस पाजतात ही त्या व्यक्तिरेखेला दिलेली कलाटणी फारशी समाधानकारक वाटत नाही. पूर्वार्धात पकड घेणारा बालक-पालक शेवटाकडे जाताना केवळ कदम काकांचा सल्ला आणि अवि व डॉलीने वयात येणाऱ्या मुलांना कसं समजून घ्यावयाबद्दल केलेल्या चर्चेत गुंततो. त्यातही अवि सारख्या कदम काका व नेहा ताईकडून योग्य मार्गदर्शन मिळालेल्या माणसाने आपल्या मुलाला पोर्नोफिल्मच्या डिव्हिडी जवळ बाळगल्या बद्दल मारणं हे विसंगत वाटतं. सर्वसाधारण पालकाची ही भूमिका असली तरीही अविच्या व्यक्तिरेखेकडून हे अपेक्षित नाही. मदन देवधर, रोहित फाळके, प्रथमेश परब, भाग्यश्री सकपाळ आणि शाश्वती पिंपळीकर या प्रमुख क़लावंताचा नैसर्गिक अभिनय महेश लिमयेचं वातावरण निर्मितीस पोषक छायाचित्रण व अवखळ मुलाच्या विश्वाचं मूड पकडणार विशाल शेखरचं संगीत प्रभावी असलं तरीही पटकथेत राहिलेल्या कच्च्या दुव्यांमुळे 'बालक-पालक' मर्यादितच आनंद देतो.

● **संतोष पाठारे**

# सिनेमासंस्कृती आणि फिल्म सोसायटी चळवळ

**(मागील अंकावरून)** **-मनोज कुलकर्णी**

**त्यात** प्रांतवाद, वर्णभेद असा दुजाभाव केला नाही. या प्रत्येक क्षेत्रात अनेक कलंदर देशोदेशी झाले. त्यामुळे अनेक तंत्रातील, कलांमधील चळवळजन्य नवे प्रवाह चित्रपटांच्याही इतिहासाचा भाग बनले. त्यांचा आस्वाद, अनुभव, जमल्यास अभ्यास चळवळीच्या वाढीला पोषक ठरेल.

सिनेमाच्या कलात्मक रूपाचा विचार प्रथम युरोपमध्येच मांडला गेला. युरोपात अशा प्रकारचे विचारमंथन सिनेमा मूक असतानाच सुरू झाले होते. फिल्म सोसायटीची कल्पना फ्रान्समधे प्रथम रूजली. पहिल्या महायुद्धानंतर मूकपटांचा प्रेक्षक वाढला. हॉलिवूडने तर अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोचायचे, त्यासाठी चित्रपटनिर्मिती करायची, अशी घोषणाच केली. त्यामुळे चित्रपटक्षेत्रात व्यापारी वृत्ती बळावली. चित्रपटाचे रसग्रहण मागे पडले. कलेपेक्षा धंद्याला महत्त्व आले. यामुळे फ्रान्समधले चित्रपटरसिक व्यथित झाले. धंदेवाईकपणाच्या झंझावातात सिनेमातले कलेचे बीज उडून जाईल की काय, अशी भीती युरोपातील कलावाद्यांना वाटू लागली. फ्रान्समधे लुईस डेलॉक (१८९०-१९२४) या समीक्षकाने त्याविरूद्ध आवाज उठवला. फिल्म सोसायटीचा पाया आपल्या लेखनाने डेलॉकने फ्रान्समधे घातला. फ्रान्समधे जे चित्रपट सिनेमागृहात पाहायला मिळत नाहीत, ते दाखवायला व त्यावर चर्चा करायला १९२० मध्ये या सोसायटीत प्रारंभ झाला.

फ्रान्समध्ये हे प्रयत्न व्यक्तिगत पातळीवर होते. लंडन फिल्म सोसायटी १९२५ मध्ये स्थापन झाली. या सोसायटीच्या स्थापनेत जॉर्ज बर्नार्ड शॉ व अन्य काही दिग्दर्शक होते. तेथेही जे चित्रपट सिनेमागृहात पाहायला मिळत नसत आणि प्रकाशित होणे शक्य नव्हते, त्यासाठी फिल्म सोसायटीची स्थापना झाली. १९२५ साली सुरू झालेल्या फिल्म सोसायट्यांचे ब्रिटिश फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज बनले. अवघ्या दहा वर्षात इंग्लंडभर सोसायट्यांचे जाळे विणले गेले. त्यांचे घोषवाक्य होते, 'चित्रपट ही कला आहे आणि तिचे संवर्धन, समीक्षा करणे हे फिल्म सोसायटीचे ध्येय आहे.' सर्गेई इझेस्टाइनचा 'बॅटलशिप पोटेम्कीन' प्रथम लंडन फिल्म सोसायटीत दाखवला गेला. १९४०-४२ नंतर युरोपात नवसिनेमा अवतरला त्यावेळी प्रकर्षाने जाणवलेही चळवळ रुजून सशक्तपणे कार्यरत होते आहे. तिचा प्रारंभ इटालियन नववास्तववाद या नावाने सुरू झाला. रॉबर्टी रोजेलिनीचा 'पेईसा', डीसिकाचा 'बायसिकल थीव्हज' इ. चित्रपटांनी हा वास्तववाद पडद्यावर यशस्वीपणे मांडला.

सिनेमा जसा आपण युरोपातून आयात केला, त्याचप्रमाणे फिल्म सोसायटी चळवळदेखील, भारतात या चळवळीचा आरंभ १९४७ ला स्वातंत्र्य मिळालं, त्याच सुमारास झाला. या अनुकूल वातावरणात ५ ऑक्टोबर १९४७ ला, धंदेवाईक सिनेमाच्या विळख्यातून सिनेमाला स्वातंत्र्य मिळावे, यासाठी सत्यजित राय यांनी कलकत्त्याला कलकत्ता फिल्म सोसायटी स्थापन केली. सदस्य संख्या अवघी पंचवीस. ही सोसायटी ब्रिटिश फिल्म फेडरेशनचे घोषवाक्य घेऊन जन्मली. आरंभ कष्टप्रद होता पण घोषवाक्य कायम होते. व्यवसाय बनलेल्या चित्रपटातील कलात्मक चित्रपट शोधणे आणि ते प्रेक्षकांपर्यंत पोचवणे; त्याद्वारे चित्रपट रसिकाच्या मनात चित्रपटकलेबाबत जाण रूजविणे, हे मुख्य काम होते. या काळात फिल्म सोसायटी हा शब्दच फारसा माहीत नव्हता. स्वाभाविकच दोन वर्षात फिल्म सोसायटीची सदस्य संख्या अवघी पंचवीस. ही सोसायटी ब्रिटिश फिल्म फेडरेशनचे घोषवाक्य घेऊन जन्मली. आरंभ कष्टप्रद होता पण घोषवाक्य कायम होते. व्यवसाय जनलेल्या चित्रपटातील कलात्मक चित्रपट शोधणे आणि ते प्रेक्षकांपर्यंत पोचवणे; त्याद्वारे चित्रपट रसिकाच्या मनात चित्रपटकलेबाबत जाण रुजविणे, हे मुख्य काम होते. या काळात फिल्म सोसायटी हा शब्दच फारसा माहीत नव्हता. स्वाभाविकच दोन वर्षात फिल्म

सोसायटीची सदस्य संख्या पंचवीसच्या वर गेली नाही. प्रवेश फी ५ रु. व वार्षिक वर्गणी ३ रु. अशी स्वस्ताई असूनही चित्रपट मिळत नाहीत आणि सभासद वाढत नाहीत. म्हणून १९५० मध्ये फिल्म सोसायटी बंद पडली.

१९५० साली भारत प्रजासत्ताक बनल्यानंतर, नवा भारत निर्मितीचे स्वप्न सामान्य नागरिकांच्या मनात नेहरूंनी जागविले. शेतीप्रधान सरंजामशाही व्यवस्थेत जखडलेल्या भारतात यंत्रयुगातील आधुनिक विचारांचा विज्ञाननिष्ठ समाजनिर्मितीचे स्वप्न नेहरूंनी पाहिले. परंतु हे स्वप्न सत्यात उतरवायचे असेल, तर हा मानसिक बदल कला करू शकतात, हे त्यांनी जाणले व यासाठी कलाक्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी साहित्य अकादमी, संगीत नाटक अकादमी, ललित कला अकादमी या केंद्रीय संस्था सुरू केल्या. याच सुमारास १९५० ला सिनेमा क्षेत्राची पुनर्रचना करण्यासाठी स. का. पाटील समिती नेमण्यात आली. यातूनच निर्मिती, वितरण, प्रदर्शन व प्रेक्षक या सिनेमा व्यवसायाच्या चारही घटकांचा सखोल अभ्यास करून कलात्मक चित्रपटनिर्मिती वाढावी, देशात सांस्कृतिक वातावरण निर्माण व्हावे, यासाठी अनेक उपाययोजना सुचविल्या. दरम्यानच्या काळात 'पथेर पांचाली' प्रदर्शित झाला.

भारतीय चित्रपटाचे नाव जगभर झाले. त्यातूनच अशा वेगळ्या प्रकारच्या सिनेमासाठी अभिरुचीसंपन्न प्रेक्षक तयार झाला पाहिजे, याची जाणीव कलकत्ता फिल्म सोसायटीच्या कार्यकर्त्यांना झाली. कलात्मक सिनेमाला प्रोत्साहन आणि चित्रपट संस्कृतीचा प्रसार होण्यासाठी कलकत्ता फिल्म सोसायटीचे सेक्रेटरी चिदानंद दासगुप्ता यांनी पुढाकार घेतला आणि दिल्लीला 'फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज ऑफ इंडिया'ची स्थापना १९५९ साली सत्यजित राय यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली. इंदिरा गांधी उपाध्यक्ष होत्या. मुंबईत के. ए. अब्बास, कलकत्त्यात मृणाल सेन ते उपाध्यक्ष झाले. १९५९ मध्ये फेडरेशनच्या स्थापनेनंतर फिल्म सोसायटी चळवळ भारतात नव्या जोमाने सुरू झाली. त्याला आता पन्नास वर्षे उलटून गेली आहेत. २००९ साली फिल्म सोसायटी चळवळ सुवर्णमहोत्सव साजरा झाला विशेष म्हणजे ५० वर्षे ही चळवळ सिनेमाप्रेमींनी स्वयंसेवी चळवळ म्हणून चालविली आहे. सांस्कृतिक क्षेत्रांतील ही स्वयंसेवी चळवळ ही देशातील महत्त्वाची घटना आहे.

सिनेमाच्या आगमनाआधी भारतभर लोकरंजनाचे कार्य लोककला करत होत्या. हाच धागा भारतात आयात केलेल्या सिनेमात असणे अपरिहार्य होते. भारतात मूकपटांना नंतर प्रारंभ झाला. दादासाहेब फाळकेंचा राजा हरिश्चंद्र (३ मे १९९३) नंतर लंकादहन (१९१७) हे चित्रपट तुफान लोकप्रिय झाले. खेड्यापाड्यातला शेतकरी वर्ग बैलगाडीतून हा मूकपट पहायला यायचा. पौराणिक कथा आणि चमत्कार हेच प्रेक्षकांचे आकर्षण होते. सिनेमाधंद्यात पैसा आहे, ते दिसताच धनिकांनी आपला पैसा फाळके यांच्या हिंदुस्थान कंपनीला पुरवला.

धनिक या व्यवसायात उतरल्याने सिनेमाचा व्यावसायिक विस्तार झाला पण सिनेमा माध्यमाचा कला म्हणून विकास खोळंबला. सिनेमा माध्यमाचे सामर्थ्य वाढविण्याचे प्रयोग युरोपच्या तुलनेत भारतीय भारतीय सिनेमात फारच कमी झाले. प्रयोग कलावंत करू शकतो, धनिक नाही. एका बाजूला परंपरानिष्ठ प्रेक्षक आणि दुसऱ्या बाजूला व्यापारी वृत्ती याच्या कात्रीत भारतीय सिनेमा १९२० नंतर अडकत गेला.

माणूस हा काळानुरूप घडतो. प्रत्येक काळात माणूस कसा बदलत गेला, हे दिग्दर्शकाच्या नजरेतून का होईना, पण चित्रपट आपल्याला दाखवत असतो. घोकलेली सुभाषित आणि अनुभवातून आलेलं शहाणपण यात जमीन-अस्मानाचा फरक असतो, नाही का? माणूस काळाचेही अपत्य असल्याने मिळालेले यश-अपयश यांची नोंद परिपक्व माणूस स्वत:च्या मर्यादित करू शकतो. सर्व यश-अपयशाचा धनी मी एकटा नसून, त्यात माझ्या काळाचाही वाटा आहे, याचे भान माणसाला चित्रपट देऊ शकतो. परिणामी, गर्व आणि अपराधीभाव यापासून माणूस दूरही राहू शकतो, ही परिपक्वता चित्रपट आपल्याला देऊ शकतात. याची अनेक उदाहरणे देता येतील. दो आंखे बारह हाथ, शेजारी,

माणूस, सुजाता, खामोश पानी आणि शिलडर्स लिस्ट ही नावे सहजगत्या चित्रपट रसिकांना आठवतील.

सिनेमासंस्कृतीला आकार देणाऱ्या प्रतिभावंतांचे या क्षेत्रातील योगदानही तितकेच महत्त्वाचे आहे. प्रारंभीच्या काळात कथा, गोष्ट सांगण्याचे माध्यम म्हणून या कलेचा जन्म झाला. प्रतिभावंतांनी सिनेमाद्वारा मनापासून गोष्टी सांगितल्या. त्यावर आधीच्या सर्व कलांचा प्रभाव कमी जास्त प्रमाणात आढळत होता. या गोष्टी सांगता-सांगता सिनेमाची कला विकसित झाली. चित्रपटाच्या आधी रंगभूमीवर संगीत नाटकांचा सुकाळ होता. त्यांच्या प्रभावामुळे हिंदीत आलमआरा आणि मराठीत अयोध्येचा राजा या आरंभीच्या बोलपटात गाणी अपरिहार्यपणे आली. सिनेमा हे काही संगीताचा प्रसार करण्यासाठी जन्मलेले माध्यम नव्हते. संगीत हे भारतीयांचे खास आकर्षण त्यामुळे गाणी हे एक बांडगुळ भारतीय सिनेमात घुसवले गेले. मोजके अपवाद वगळता भारतीय उपखंड सोडल्यास जगातील कोणत्याच सिनेमात गाणी नाहीत.

सिनेमा हे प्रतिमा माध्यम आहे, त्यामुळे आपण केवळ प्रतिमा माध्यमाच्या सामर्थ्यावर भारतीय प्रेक्षकांना सिनेमाकडे आकर्षित करू शकू, असे आरंभीच्या दिग्दर्शकांना वाटले नसावे, यासाठी गाण्यांची योजना झाली असावी. बोलपटांना सत्तर/ऐंशी वर्षे होत आली आहेत, तरीही भल्याभल्या दिग्दर्शकांनी गाणी वगळण्याचे धडस केले नाही, गुरुदत्त, बिमल रॉय, राजकपूर, राजा परांजपे यांच्या सारख्या श्रेष्ठ दिग्दर्शकांनी ही चौकट न भेदता गाण्यांचा कलात्मक उपयोग साधण्याचा प्रयत्न केला. बी.आर.चोप्रांसारख्या व्यावसायिक दिग्दर्शकाने एकही गाणे न घेता 'कानून' चित्रपट निर्माण केला. पण तो प्रयोग यशस्वी होऊनही फारसा स्वीकारला गेला नाही, याचे कारण भारतीयांची जैसे थे वादी वृत्ती, प्रचलित विचारसरणीत होऊ पाहणाऱ्या बदलास, परिवर्तनास विरोध! इतकी वर्षे होऊनही प्रेक्षकांच्या अभिरुचीत या कालखंडात फारसा बदल झालेला दिसत नाही. थोडीफार प्रगीत झाली, पण तीही कलात्मक चित्रपटांना हवी तेवढी पोषक नाही, हे जाणवते.

● चित्रपट हे द्विदर्शकाचे आंतरराष्ट्रीय कलामाध्यम आहे. याची जाण असणारे पहिले भारतीय प्रतिभावान दिग्दर्शक म्हणजे सत्यजित राय आणि त्याचबरोबर सिनेमा हे तंत्राधिष्ठित माध्यम आहे, याची जाणीव असणारे या देशातले पहिले दिग्दर्शक म्हणजे व्ही. शांताराम.

● बोलपटाचे पहिले दशक १९३९-४० हे प्रभात बॉम्बे टॉकिज व न्यू थियेटर्स यांनी गाजविले. न्यू थियेटर्स ने सैगलच्या संगीतावर भर दिला, पण कथानके नाटकाचीच राहिली. प्रभातने मात्र चित्रपटातून सामाजिक समस्या आणि संतपटातून सहिष्णुता या मूल्यांवर भर दिला. प्रभातचा कल प्रबोधनपर उद्बोधक चित्रपट निर्माण करण्याकडे राहिला. या पहिल्या दशकातला सर्वोत्कृष्ट चित्रपट म्हणजे प्रभातचा माणूस (१९३९) दिग्दर्शक व्ही. शांताराम! याच दशकातला न्यू थियेटर्सचा देवदास (१९३६), रसिकांना यांची कथानके सांगण्याची गरज नाही. माणूसचे इंग्रजी नाव होते लाईफ इज फॉर लिव्हिंग. सिनेमाचा आशयही तोच होता. माणूसने प्रभातच्या कीर्तीत भर घातली पण तो आर्थिकदृष्ट्या अयशस्वी झाला. प्रेक्षकांनी कुंकू (१९३७) आणि ब्रह्मचारी (१९३८) हे उचलून धरले. विजीगीषू वृत्तीच दर्शन घडवणारा माणूस प्रेमात असफल होणाऱ्या व्यक्तीचे कथानक असलेल्या देवदास समोर बॉक्स ऑफिसवर कमी पडला तो केवळ सैगल्चाय गाण्यांमुळे हे मान्य करावं लागतं.

● दुसरे दशक १९४७-५१ या दहावर्षात दुसऱ्या महायुद्धामुळे मध्यमवर्गीय प्रेक्षकांबरोबर कामगार वर्ग ही सिनेमाकडे आकर्षित झाला. व्यावसायिक सिनेमाची चलती राहिली. या दशकात मराठीत रामजोशी (दिग्द. शांतारामबापू) आणि बाबूराव पेंढारकरांचा जय मल्हार हे महत्त्वपूर्ण चित्रपट होते. हिंदीत मद्रासच्या एस. एस. वासन यांच्या चंद्रलेखाने भरघोस व्यावसायिक यश मिळविले होते. याच दरम्यान आलेला उदय-शंकर यांच्या 'कल्पना'ने कलात्मक चित्रपटांचा आदर्श निर्माण केला पण तो आर्थिक दृष्ट्या अपयशी ठरला.

(अपूर्ण)

# संस्कृती संवादाचे अवशेष

● जी. के. ऐनापुरे



**कन्नड दिग्दर्शक गिरीश कासारवल्ली पुण्याच्या फिल्म इन्स्टिट्यूट मधून दिग्दर्शनाचा डिप्लोमा घेऊन बाहेर पडले. आणि घटश्राद्ध (१९७८) या पहिल्याचं चित्रपटानें राष्ट्रीय स्तरावर पोचले. १९७८ ते २०१२ या पंचवीस वर्षात गिरीशनी सातत्यानें १३ कन्नड चित्रपट दिग्दर्शित केले. त्यांच्या चित्रपट विश्वाचा वेध घेणारी ही लेखमाला**

## लेखांक पांचवा

**सिनेमाच्या** आशयाशी जोडून घेतात. सहजासहजी बाजूला होऊ देत नाहीत. कथाशय पुरविण्यासाठी कासारवल्ली ह्यांनी ह्यांचा चांगला उपयोग करून घेतला आहे. बऱ्याच दिवसांनी शेताचे, जनावरांचे (रोप लावणे, नागीचे जनावरांना हंकारणे, कृष्णाशी अबोला धरल्यानंतरच रेडकाशी चाललेलं बोलणं, रेडकाला चारा आणणं, शेतात काम करणाऱ्या बायकांची गाणी ऐकायला येऊन नागीचं तस गुणगुणनं इ.) संदर्भ आपल्याला 'द्विपा'च्या निमित्ताने बघायला मिळतात. या तपशिलामुळे आपलं बघणं स्वच्छ आणि ताजं बनतं.

'द्विपा'तील काही दृश्यांबद्दल बोलायला हवं. ही दृश्ये सूक्ष्म आणि मोठ्या अंगाची आहेत. आशयाच्या अनेक पातळ्या. अर्थाता धरून आणि पात्राच्या वर्तनाला पुष्ट करणाऱ्या अंगाने जाणारी आहेत. कासारवल्ली ह्यांचं दिग्दर्शन म्हणून असलेलं सिद्ध होणंच त्यातून समोर येतं. ह्यात तंत्राची बाजू फारशी दिसत नाही. हे सगळ्यात महत्त्वाचं. दुगाम्मा सर्व्हे (जमिनीचा) करायच्या लेन्समधून बघतो आणि हसतो. मृत्यूच्या अगोदर नेमपूजेसाठी शेवटचा मेकअप करतो. अबोल होऊन गप्प बसणे, पोलिसांबरोबर जाताना (डोणक्यातून) हातातली काठी फेकून देणे, जागा न सोडण्याबद्दल ठाम असतानाचं त्याचं बोलणं, नेमपूजेचं बेजरिंग केल्यावर 'कायतरी बुडल्यावर नवीन कायतरी वर येतंच' हे त्यानं स्वीकारलेलं सत्य सांगतानाचा त्याचा आवाज, अशा अनेक दृश्यातनं दुगाप्पा वर्तमान आणि भूतकाळाच्या सीमारेषेवर घुटमळताना आपल्याला दिसतो. वर्तमानाच्या भीतीपोटी आलेला हताशपणा, त्यावर ठाम राहण्यासाठी आणलेलं उसनं अवसान, भूतकाळाबद्दल सांगतानाची दिसणारी सहजता दुगाप्पाच्या वयानुसार आपल्याला त्याच्या चेहरावर सहजच अवतरलेली दिसते. दुगाप्पाबरोबर जोडलेला यक्षगान (नेमेपूजा) चा संबंध त्याच्या मृत्यूमुळे आपल्याला अधिकच हेलवून सोडतो. त्याने आपल्या अंगावर चढवलेल्या एक एक वस्तू ज्यावेळी नागीला

तुंबलेल्या नव्या पाण्यात सापडतात. त्यावेळी आपल्याला दुगाप्पाचा मेकअप केलेला चेहरा आठवतो. दुगाप्पाच्या मृत्यूसाठी यक्षगानचं केलेलं प्रयोजन दिग्दर्शक म्हणून कासारवल्ली ज्या पद्धतीने दाखवतात. त्याला तोंड नाही. मृत्यू आणि संकट म्हणून अवतरलेलं पाणी ह्यांचा एक दुर्मिळ संयोग आपल्याला पहायला मिळतो.

(‘यक्षगान’ बद्दल कासारवल्ली यांना वेगळी काहीतरी टिप्पणी करायची आहे की काय, अशी आपल्याला शंका येते.) नागी आणि दुगाप्पाच्या बोलण्यात इकडे तिकडे होणारा. कृष्णा आल्यावर विस्कटलेला, नागी आपल्यापासून दूर चालली आहे, हे ध्यानात आल्यावर अबोल झालेला गणप्पा अनेक दृश्यात आपल्याला दिसतो. दुगाप्पा असतानाचा आणि दुगाप्पा नसतानाचा गणप्पया अनेक दृश्यातनं, संवादाच्या तुटक तुटक लयीतनं आपल्याला जाणवतो. अंगावर घोंगडे घेऊन झोपलेला आणि आजूबाजूला बरंच काही घडत असताना, नागी येऊन पुन्हा पुन्हा हलवल्यावर सुद्धा मेल्यासारखा पडून राहणारा गणप्पाया, हे प्रदीर्घ दृश्य, कृष्णाचं हर्षवायू झाल्यासारखं सायकल चालवणं, अडणाऱ्या छत्रीचा सहजपणा, कृष्णा आल्यावर आनंदी झालेली नागी परड्याच्या आत जाताना एक लांबलचक झालेला बांबू ओढते आणि कॅमेऱ्याच्या क्लोजअपमध्ये पाण्याचे एक-दोन थेंब हळूवार ठिबकताना दिसतात. ह्या दृश्यातनं नागी-कृष्णाचा संबंधाचा अंदाज आपल्याला काढता येतो. कृष्णाच्या पायावरच्या जळवा काढणं, बुडताना त्याला वर बोटीत घेतानाची सहजता. कृष्णाच्या तळव्याला (हाताच्या) नागीनं हाताच्या तळव्याने तेल चोळतानाच्या दोन्ही हाताच्या (नागीच्या आणि कृष्णाच्या) होणाऱ्या हालचाली, मला निलगिरीचा वास आवडत नाही म्हणून नागीच्या गादीला जोडलेली गाडी बाजूला करणं, अशा अनेक दृश्यातनं सहजता आशयाला वर वर काढताना दिसते. प्रत्येक दृश्य कथेच्या आशयाला खोली देण्याच्या अंगाने सिनेमाच्या पुढे सरकण्याच्या हालचालींमध्ये गुंतून जातं. हे फार कमी वेळा जुळून येतं आणि जुळून आलं तरी टिकत नाही. ‘द्विपा’ची खासियत हीच आहे. ह्यातील दृश्य आणि आशय एकमेकांना अंगावर खेळवत सिनेमाच्या शेवटपर्यंत टिकून राहतात आणि प्रदीर्घपणात सिनेमा संपल्यावर सुद्धा ‘द्विपा’मधील पाऊस पाणी दृश्यातील आशय समृद्ध करणारे वेगवेगळे अर्थ आपल्याला अस्वस्थ करतात. ‘द्विपा’ची तरलता काव्यात्मता, साधेपणा त्याच्यामुळे तर टिकून राहतो.

‘द्विपा’तील नागी ह्या पात्राबद्दल कासारवल्ली यांनी एका मुलाखतीत विस्ताराने आपले मत मांडले आहे. त्यांच्या मते, नागी हे ऊर्जा आणि सौंदर्य यांचे एक सुंदर प्रतीक आहे. ते तसे प्रत्येक व्यक्तीमध्ये असते. कुठलीही व्यक्ती ताणाखाली येऊन मोडून जात नाही. तर त्या क्षणापुरतीच वाकून जाते आणि पुन्हा त्या अवघड क्षणावर मात करते.

●●●

प्रभात चित्र मंडळाचे मासिक वास्तव रूपवाणी

**वार्षिक वर्गणी १००रु.**
**प्रभात सदस्य वा.व. ५० रु.**
**अन्य फिल्म सोसायटी**
**सदस्य वा.व. ७५ रु.**
**पाच वर्षांची ४००रु.**

वर्गणी **प्रभात चित्र मंडळ** या नावे मनी ऑर्डर अथवा डीडीने पाठवावी. बाहेरील गावचे चेक स्वीकारले जाणार नाहीत.

**प्रभात चित्र मंडळ :** शारदा सिनेमा, पहिला मजला, दादर, मुंबई-४०००१४.

संपादक : **सुधीर नांदगांवकर,** मुखपृष्ठ/मांडणी/व्यंगचित्र:**रघुवीर कुल**
मुद्रक,प्रकाशक:**संदीप मांजरेकर** छपाई :**रचनामुद्रण**,दादर,मुंबई-१४. Email : cinesudhir@gmail.com

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

**Vastav Roopwani** (Monthly) February- **2013** MH/MR/EAST/82/2012-14
20th year of Publication RNI No.59908/94

प्रति,

**प्रेषक : वास्तव रूपवाणी** प्रभात चित्र मंडळ, शारदा सिनेमा, दादर, मुंबई-४०००१४.

## लंडन कॉन्फरन्समधे जालना येथील प्राध्यापकांचे प्रबंध

लंडनच्या सेंटी मेरी युनिव्हर्सिटीने मार्चमधे सिनेमा विषयक कॉन्फरन्स आयोजित केली असून त्यात जालना येथील कॉलेजचे प्राध्यापक रजनीकांत वळसे आणि संतोष करवंदे यांचे प्रबंध स्वीकारण्यात आले आहेत. कॉन्फरन्सचा विषय 'गोथिक कल्चर, सब कल्चर आणि काऊंटर कल्चर' असा आहे. रजनीकांत यांनी साइजिंग दि ग्रीड, लस्ट फॉर वेल्थ ॲंज न्हेन्जफुल लर्कींग घोस्ट इन राजा नवाथेज 'गुमनाम' हा विषय मांडला असून प्रा. करवंदेच्या प्रबंधाचा विषय 'हॅलो टू यू स्पिरीट गोथिक/रोमॅंटिक मॉसिटी ॲण्ड बॉलीवूड हॉरर ट्रॅडिशन.

## राम गोपाल '२६/११' चा हल्ला बर्लीन मधे

राम गोपाल वर्मा निर्मित दि अटॅक ऑफ २६/११ ६३ व्या बर्लीन महोत्सवात दाखविण्यात येणार आहे. भारतात हा चित्रपट अद्याप प्रकाशीत झाला नाही.

### प्रभात : फेब्रुवारी महिन्याचे कार्यक्रम

| | |
|---|---|
| ११ फेब्रु. (सोम.) | **चितगांव** दिग्द. वेदव्रत पेन (२०१२/बंगाली/१०५मि.) |
| १८ फेब्रु. (सोम.) | **दि लव्हर ऑफ दि सॉइल** दिग्द. झात्सील पोगाई (२०१०/हंगेरी/१००मि.) |
| १९ फेब्रु. (मंगळ) | **लॉस्ट टाइम** दिग्द. अरॉन मत्स्यासी (२००९/हंगेरी/९०मि./रंगीत) **आणि डेथ वॉल्टझ** दिग्द. के. करोली (२०००/हंगेरी/९०मि./कलर) |

**रंगस्वर, चव्हाण सेंटर सायं. ६.३० वा.**

### फा य न ल क ट

**रघुवीर कुल**




**बघायला लोक प्रेमाने थियेटर मध्ये जातात ही मराठी सिनेमासाठी आनंद वार्ता आहे.**